महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

# महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी

पहिला मजला, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४००००१

**शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा करार (कंत्राट) पध्दतीने घेणेबाबत**

## जाहिरात

| अ.क्र. | पदांचा तपशिल | एकूण पदे | कालावधी | अर्ज करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | कौशल्य अभियान अधिकारी - २ | ०१ | ११ महिने | २१/०९/२०२६ |
| २ | कौशल्य अभियान अधिकारी - ३ | ०१ | | |
| ३ | सहायक लेखा अधिकारी | ०१ | | |

- आपले अर्ज (Resume) registrar@mssds.in या ई-मेल आयडी वर पाठवावेत.
- अधिक माहितीकरीता https://www.kaushalya.mahaswayam.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी
- पद मुलाखतीव्दारे भरण्यात येईल.

**पात्रता : १. कौशल्य अभियान अधिकारी - २** (Skill Mission Officer - २)

सेवानिवृत्त मंत्रालयीन कक्ष अधिकारी अथवा कोणतेही क्षेत्रिय विभागाच्या मुख्यालयात किमान ५ वर्षे अनुभव असलेले समकक्ष अधिकारी असावेत. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**२. कौशल्य अभियान अधिकारी - ३** (Skill Mission Officer - ३)

सेवानिवृत्त मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी अथवा कोणतेही क्षेत्रिय विभागाच्या मुख्यालयात किमान ५ वर्षे अनुभव असलेले समकक्ष अधिकारी असावेत. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**३. सहायक लेखा अधिकारी** (Assistant Accounts Officer)

नामांकित संस्थेतून वाणिज्य/लेखा/वित्त शाखेची पदवी (किंवा समतुल्य) लेखा/अंकेक्षण/कॉस्टिंग मधील किमान ८ वर्षाचा अनुभव, वित्त/लेखा, अंदाजपत्रक, वित्तीय नियंत्रण, टीम मॅनेजमेंट आणि प्रशासनाचा अनुभव. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे तसेच संगणक हाताळणीचे ज्ञान असावे.
उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

स्वा /-

मुख्य कार्यकारी अधिकारी

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी

इतर :-

१. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, पहिला मजला, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, ३, धोबी तलाव, महापालिका मार्ग, मुंबई-४००००१ येथे काम करावे लागेल.

२. सदर पदे मुलाखतीद्वारे भरण्यात येणार असून अनुभवाच्या आधारे निवड करण्यात येईल.

३. कंत्राटी / करार पध्दतीने निवड केलेल्या अधिकाऱ्यांच्या /कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधी कमी करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे राहिल.

४. कंत्राटी / करार तत्त्वावर नियुक्ती देण्यात आलेले अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ मधील व याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

५. भरती प्रक्रिया राबविणे किंवा स्थगित करणे किंवा रद्द करण्याचे पूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असतील.

६. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

७. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी शारीरिक व मानसिक दृष्टीने सक्षम असल्याबाबतचा डॉक्टरांचा रिपोर्ट सोबत अर्जासोबत जोडावा.

८. कंत्राटी / करार तत्त्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

९. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक आहे.

१०. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. याबाबत या कार्यालयाकडून खातरजमा करण्यात येईल.

११. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी दिलेल्या नमुन्यामध्येच अर्ज भरावयाचा आहे.

स्वा /-

मुख्य कार्यकारी अधिकारी

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी